## जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार या कार्यालयामार्फत खालील प्रमाणे योजना राबविल्या जात असून त्या पुढील प्रमाणे

**अ-आदिवासी उपयोजना अंतर्गत --**

**अ-१-आदिवासी सहकारी संस्थांचे भाग खरेदीसाठी ७ वर्षे मुदतीचे बिनव्याजी कर्जः-**
आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सभासदांना संस्थेचे सभासद होण्यासाठी शासनाकडून आदिवासी सहकारी संस्थाचे भाग खरेदी करणेसाठी ७ वर्षे मुदतीचे बिनव्याजी कर्ज देण्यात येते. या योजनेअंतर्गत प्रत्येक सभासदास भाग खरेदीसाठी रु.१०० देण्यात येतात.

**अ-२-बुडीत कर्ज राखीव निधीसाठी अर्थसहाय्यः-**
आदिवासी वि.का. संस्थेस शासनाकडून बुडीत कर्ज राखीव निधीसाठी ची तरतुद या योजने अंतर्गत मागील वर्षाचे कर्ज वाटपापेक्षा चालु वर्षी जादा झालेल्या कर्ज वाटपावर ५ टक्के रक्कम संस्थाना अनुदान म्हणून मंजुर करण्यात येते.
आदिवासी विकास विभागाच्या जुन्या आदिवासी संस्थांबाबतच्या दि.१८/८/१९७६ च्या शासननिर्णयनुसार येण् बाकीच्या ५ टक्के जास्तीत जास्त रु.९०,०००/- बुडीत कर्ज राखीव निधी शासकीय अनुदान देऊन जिल्हा बँकेत स्वतंत्र निधीत या अनुदानाची रक्कम गुतविण्याची योजना होती.नविन संस्थांचे लहान कार्यक्षेत्र व कमी होणारे कर्ज वाटप लक्षात घेता या निधीची कमाल मर्यादा रु.९०,०००/- च्या ऐवजी रु.३००००/- पर्यत करण्यात आली आहे.

**अ-३-आदिवासी सहकारी साखर कारखान्याचे भाग खरेदीसाठी अर्थसहाय्यः-**
आदिवासी सहकारी साखर कारखान्याचे सभासद होण्याकरिता शासनाकडून ५० टक्के कर्ज व ५० टक्के अनुदान रुपाने असे रु. एकुण ५०००/- संबधीत साखर कारखान्यास प्रति सभासद शेअर्स खरेदीसाठी मंजुर करण्याची योजना आहे.

**अ-४-आदिवासीं सभासदांना व्याज अर्थ सहाय्य ५ टक्केप्रमाणेः-**
आदिवासी सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील रु.१५०००/- चे आंत कर्ज घेणारे तसेच आर्थिक वर्षात पुर्ण परतफेड करणा-या आदिवासी भागातील अल्प व अत्यल्प भुधारक आदिवासी सभासदांना ५ टक्के व्याज अनुदान देण्याची शासनाची योजना आहे.

**अ-५-आदिवासी वि.का. संस्थांना पुनर्रचनेसाठी भागभांडवलः-**

जिल्हयातील आदिवासी वि.का.संस्थांना भागभांडवल उपलब्ध होण्यासाठी व पुनर्रचना करण्यासाठी प्रत्येक संस्थेस रु. १०,०००/- भागभांडवल प्रती वर्षी देण्याची योजना आहे

**अ-६-आदीवासी विविध कार्यकारी संस्थाना स्वस्त धान्याचे दुकानासाठी व्यवस्थापकीय अनुदानः-**

स्वस्त धान्य दुकानास येणारा तोटा भरुन काढण्यासाठी प्रति दुकान प्रति वर्षी रु २५००/- किंवा प्रत्यक्ष तोटा यात कमी असणारी रक्कम ३ वर्षा पर्यंत देण्याची योजना आहे.

गटपातळीवरील ग्रामीण कारागिरांच्या सहकारी संस्थांना भागभांडवल १:२ प्रमाणात गटपातळीवरील ग्रामीण कारागिरांच्या सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल देण्याची योजना आहे.

**अ-७-डॉ.पंजाबराव देशमुख पिक उत्पादन प्रोत्साहन योजनाः-**

जे शेतकरी सहकारी कृषि पत संस्थामार्फत रु.१५००० अथवा त्यापेक्षा कमी पीक कर्ज घेऊन त्यांची मुदतीत कर्जफेड करतील त्यांचेसाठी पीक उत्पादन प्रोत्साहन योजना क्र.सी.सी.आर-१४९१/सी.आर. ७१४/२ सी दि.२-११-९१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. या योजनेव्दारे शेतक-यांनी प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांकडून घेतलेल्या रु.१००००/- व त्यापेक्षा कमी कर्जावर उत्पादन प्रोत्साहन म्हणून ४ टक्के लाभाची रक्कम मंजुर करण्यात येत आहे.तद्नंतर दि.२४-५-९४ च्या शासननिर्णयान्वये सदर योजनेची व्याप्ती रु १०,०००/- वरून रु.१५,०००/-पर्यत वाढविणेत आली.दि.११-६-२००७ च्या शासननिर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेची व्याप्ती वाढविणेत आलेली आहे. या योजनेची ठळक वैशिष्ठ खालील प्रमाणे :-

१.या योजनेनुसार त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा यंत्रणेकडून रु.२५,०००/- पर्यंतचे पीक कर्ज घेणा-या आणि विहीत मुदतीत परतफेड करणारे शेतक-यांना ४ टक्के वार्षिकदराने व्याजाची सवलत चालु राहील.

२.या योजनेनुसार त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा यंत्रणेकडून रु.२५,०००/- पेक्षा जास्त पण रु. ३/- लाखापर्यतचे अल्प मुदतीचे पीक कर्ज घेणा-या आणि विहीत मुदतीत परतफेड करणारे शेतक-यांना २ टक्के वार्षिकदराने व्याजाची सवलत चालु राहील.

३.उपरोक्त १ व २ मध्ये नमुद केल्यानुसार शेतक-यांनी घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची परतफेड प्रत्येक वर्षी दि.३० जुन पर्यत केल्यास ते या योजनेअंतर्गत सवलत घेण्यास पात्र असतील.

४.सुधारीत डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ सन २००६-२००७ या हंगामापासुन अल्प मुदत पीक कर्ज घेणा-या शेतक-यांना देण्यात येईल.